स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in
Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/ए-१ गोपनीय/प्रा.प./ 1045
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक - १३.०७.२०२२

प्रति,
मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय :** - जुलै-ऑगस्ट २०२२ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेच्या ( इ.१० वी ) वेळापत्रकाबाबत...

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, जुलै-ऑगस्ट २०२२ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा ( इ.१० वी ) खाली नमूद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.

| अ.क्र | परीक्षेचा तपशील | परीक्षेचा दिनांक |
|---|---|---|
| १ | लेखी परीक्षा | बुधवार दिनांक २७ जुलै, २०२२ ते शुक्रवार दिनांक १२ ऑगस्ट, २०२२ |
| २ | प्रात्यक्षिक,श्रेणी,तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा | मंगळवार दिनांक २६ जुलै,२०२२ ते सोमवार दिनांक ८ ऑगस्ट, २०२२ |
| ३ | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची व पूर्व व्यावसायिक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार दिनांक २६ जुलै,२०२२ ते सोमवार दिनांक ८ ऑगस्ट, २०२२ |
| ४ | शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार दिनांक २६ जुलै,२०२२ ते सोमवार दिनांक ८ ऑगस्ट, २०२२ |
| ५ | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | मंगळवार दिनांक २६ जुलै,२०२२ ते शुक्रवार दिनांक ५ ऑगस्ट, २०२२ |

**सदर परीक्षेसाठी खालील सूचनानुसार कार्यवाही करावी.**

1. विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा प्रचलित पध्दतीने परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल.
2. दिव्यांग विद्यार्थ्यांच्या कार्यनुभव विषयांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा **दिनांक मंगळवार दि.२६ जुलै,२०२२ ते शुक्रवार दि.५ ऑगस्ट, २०२२** या कालावधीत विद्यार्थी संख्येनुसार संबंधित शाळा मुख्याध्यापक यांनी आपल्या स्तरावरून प्रचलित कार्यपध्दतीनुसार आयोजित कराव्यात.
3. वर नमूद केलेल्या विषयांव्यतिरिक्त अन्य कार्यानुभवाचे विषय घेवून विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ झाला असल्यास वरील निर्धारीत कालावधीतच सदर विषयांची परीक्षा आयोजित करावी.
4. विद्यार्थी संख्येनुसार शाळानी उपरोक्त नमूद केलेल्या कालावधीत **दिनांक २६/०७/२०२२ ते दिनांक ०८/०८/२०२२** परीक्षा घेणे, संबंधित त्यांच्या परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वीच विद्यार्थ्यांना अवगत करण्याची दक्षता घ्यावी.
5. अंध,मूकबधीर अपंग, बहूविकलांग विद्यार्थ्यासाठी असलेल्या शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र या विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा **दिनांक २६/०७/२०२२ ते दिनांक ०८/०८/२०२२** या कालावधीतच आयोजित करण्यात यावी.
6. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२२ च्या प्रात्यक्षिक परीक्षा वर नमूद केलेल्या दिनांकासच आयोजन करावे. सदर परीक्षेचे वेळापत्रक संबंधित शाळांनी विभागीय मंडळाकडे परीक्षेपूर्वी पाठवावे. त्यानुसार सदर परीक्षा कालावधीत विभागीय मंडळाचे भरारी पथक शाळेना भेटी देतील. तंत्र व पूर्व व्यवसायिक प्रात्यक्षिक परीक्षा **दिनांक २६/०७/२०२२ ते दिनांक ०८/०८/२०२२** कालावधीत दरम्यान आयोजित करण्यात याव्यात.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर